झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा /सप्रा-१ / १०५७/२०२२
दिनांक : २९ /०९ /२०२२

# झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना )**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव मौजे पर्वती स.नं. ९२ पैकी व स.नं.९३ पैकी शाहु वसाहत या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टी क्षेत्रावर अंदाजे क्षेत्रफळ १०,३७४.११ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) हे क्षेत्र पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.केदार असोसिएट्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.३०/०३/२०११ रोजी झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे; आणि

ज्याअर्थी, खालील अनुसूचीमधील क्षेत्र जमिनीची मिळकत पत्रिकेनुसार फा.प्लॉट क्र.५१०, ची महाराष्ट्र शासन महसुल विभाग यांचे मालकीची असलेचे दिसुन येते. तसेच, ५११ पैकी २१४७.०० चौ.मी. व ५११ब पैकी ३५२.७० चौ.मी. इतके क्षेत्र हे सरपंच पर्वती देवस्थान यांचे मालकीचे व फा.प्लॉट क्र.५११अ ची मालकी महाराष्ट्र हौसिंग बोर्ड (म्हाडा) यांची असून या क्षेत्राचे विकसन हक्क झोपडीधारकांनी ७०% संमती देऊन नेमलेल्या विकसकाने प्राप्त केले आहेत; आणि

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र दि.०८/१२/१९८३ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्र (भाग-१ पुरवणी) अन्वये घोषित करण्यात आले असलेबाबत नगर अभियंता (ग.व.नि .), पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दि.०६/१२/१९९७ रोजी दाखला दिलेला आहे; आणि

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पुर्वसूचना (सुधारित आदेश) महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१७ ते २३ मार्च २०२२ तसेच दै.महाराष्ट्र टाइम्स व दै.पुढारी वृत्तपत्रात दि.०९/०३/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष योजनाक्षेत्रामधील/ झोपडपट्टीमधील जागेवर डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, उपरोक्त दि.०७/०३/२०२२ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र (पुर्वसूचना) सुधारित आदेशावर श्री.देवदेवेश्वर संस्थान पर्वती व कोथरुड, पुणे तसेच, कोणार्क सहकारी संस्था मर्या. पुणे व एकुण २१५ झोपडीधारकांच्या विहीत मुदतीत हरकत प्राप्त झाली होती.

सदर पुर्वसूचना सुधारित आदेश (३क) वर श्री.देवदेवश्वर संस्थान, पर्वती व कोथरुड, पुणे यांनी दि.२९/०३/२०२२ रोजी हरकत अर्ज दाखल केला असुन जागापैकी काही क्षेत्र श्री.देवदेवश्वर संस्थान पर्वती व कोथरुड या सार्वजनिक न्यासाची असलेने व्यवस्थापक, श्री.देवदेवश्वर संस्थान पर्वती व कोथरुड यांनी हरकत घेतली आहे. त्याअनुषंगाने, हरकतदार व्यवस्थापक, श्री.देवदेवेश्वर संस्थान, पर्वती व कोथरुड, पुणे यांनी त्यांचे लेखी म्हणणे/ कागदपत्रे सादर केलेली नसल्याने व त्यांचे हरकतीमध्ये तथ्य दिसुन येत नसल्याने त्यांची हरकत दि.२२/०९/२०२२ रोजी स्वतंत्र निकालपत्रान्वये फेटाळण्यात आली आहे.

तसेच, पुर्वसूचना सुधारित आदेश (३क) वर दि.०६/०४/२०२२ रोजीचे पत्रान्वये कोणार्क सहकारी गृहरचना संस्था मर्या. सदर झोपडपट्टी पुनवसन योजना जाहीर करताना चतु:सिमा सुस्पष्ट केलेल्या नसल्याने, त्याबाबतची मोजणी व नकाशा प्रसिध्द केलेला नाही. सोसायटीची आपेन स्पेस असुन त्याठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रस्तावित करता येणार नाही. तसेच सदर योजना जाहीर करणेपुर्वी संयुक्त मोजणी करुन हद्दी निश्चित करणे गरजेचे असलेबाबत हरकत घेतली आहे. त्याअनुषंगाने, कोणार्क सहकारी गृहरचना संस्था मर्या. यांचेतर्फे सुनावणीस उपस्थित श्री.मनोहर नरसिंग वन्नम व इतर ०७ यांनी सदर सुधारित आदेशावर हरकत नसल्याचे सुनावणी दरम्यान तोंडी सांगितल्याने सदर हरकत दि.२२/०९/२०२२ रोजी स्वतंत्र निकालपत्रान्वये फेटाळण्यात आली आहे.

तसेच सदर योजना क्षेत्राच्या प्राथमिक पात्रता यादीतील व यादीबाहय श्री.राजु लक्ष्मण उकिरडे व इतर १५५ झोपडीधारक यांनी घेतलेल्या हरकतीमध्ये झोपडीधारकांनी नमुद केलेप्रमाणे विकसक यांनी खोटी संमतीपत्र सादर केली असुन, विषयांकित मिळकतीवर त्याची पक्की घरे असुन सर्व मुलभुत सुविधा उपलब्ध असुन, एस.आर.ए. योजना राबविणेस हरकत असल्याचे सांगितले, या

ठिकाणी यापुर्वी सरकारी योजनेमधुन घरे बांधणेत आली असुन सदरची जागा ही म्हाडा यांची असुन सदर झोपडपट्टी घोषित होण्या आधीपासुन सदर ठिकाणी राहत असुन झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेपुर्वी आमचे म्हणणे विचारात घेणे आवश्यक आहे व आमचे परवानगीशिवाय या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवु नये अशी विनंती करुन हरकत दाखल केली आहे. त्यानुसार, श्री.राजु लक्ष्मण उकिरडे व इतर १५५ झोपडीधारक यांची हरकत यापुर्वीच मा.शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई यांनी दि.१६/०३/२०२१ रोजीचे आदेशान्वये फेटाळली असल्याने, झोपडीधारक पुन:श्च त्याच हरकती मांडत असल्याने हरकतीमध्ये काही तथ्य नसल्याने त्यांची हरकत दि.२२/०९/२०२२ रोजी स्वतंत्र निकालपत्रान्वये फेटाळण्यात आली आहे.

तसेच, योजना क्षेत्राच्या प्राथमिक पात्रता यादीमध्ये समाविष्ट असलेल्या व योजनेला संमती न दिलेल्या श्रीमती इंदुबाई दशरथ अडागळे व इतर ५६ झोपडीधारक यांनी घेतलेल्या हरकतीमध्ये झोपडीधारकांनी नमुद केलेप्रमाणे विकसक यांनी खोटी संमतीपत्र सादर केली असुन विषयांकित मिळकतीवर त्यांची पक्की घरे असुन, सर्व मुलभुत सुविधा उपलब्ध असल्याने एस.आर.ए. योजना राबविणेस हरकत सांगितली. या ठिकाणी यापुर्वी सरकारी योजनेमधुन घरे बांधणेत आली असुन सदरची जागा ही म्हाडा यांची असुन सदर झोपडपट्टी घोषित होण्या आधीपासुन सदर ठिकाणी राहत असुन झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणे पुर्वी आमचे म्हणणे विचारात घेणे आवश्यक आहे व आमचे परवानगीशिवाय या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवु नये, अशी विनंती झोपडीधारकांनी केली. तसेच, सदर जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना सोडुन दुसरी कोणतीही शासकीय योजना राबविणेस त्यांची हरकत नसलेबाबत सुनावणी दरम्यान तोंडी कथन केले आहे. त्यानुसार श्रीमती इंदुबाई दशरथ अडागळे व इतर ५६ झोपडीधारक यांचे हरकतीच्या मुद्दयांमध्ये तथ्य नसल्याने त्यांची हरकत दि.२२/०९/२०२२ रोजी स्वतंत्र निकालपत्रान्वये फेटाळण्यात आली आहे व सदर निकालपत्राची प्रत सर्व संबंधितांना निर्गमित करणेत आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांना दि.०२/०९/२०२२ रोजीचे पत्रान्वये फा.प्लॉट क्र. ५११ पै. व ५११ब पै., शाहु वसाहत, पर्वती, पुणे वरील अनुक्रमे देवस्थानच्या मालकीची २१४७.०० चौ.मी. व ३५२.७० चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश करणेकामी त्यांचा काही आक्षेप/ हरकती/ सूचना असलेस इकडील कार्यालयास सात दिवसांत सादर करणेबाबत कळविलेले आहे. परंतु, त्यांचेमार्फत अद्यापपर्यंत कोणतेही लेखी म्हणणे या कार्यालयास प्राप्त झालेले नाही; आणि

ज्याअर्थी, उपरोक्त सर्व आक्षेप/ हरकती/ सूचना/ दावे, पुरावे आणि उपरोक्त नमुद बाबी विचारात घेऊन, खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्राच्या बाबतीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र

म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री पटली आहे;

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे;

सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## <u>अनुसूची</u>

<u>झोपडपट्टीचे नाव</u> : शाहु वसाहत, पर्वती, पुणे
<u>महानगरपालिका क्षेत्र</u> :- पुणे महानगरपालिका, पुणे

| गाव | स.नं. व फा.प्लॉट नं. | पुर्वसूचने मध्ये नमुद क्षेत्र ( चौ. मी.) | वाढ / घट | अंतिम अधिसूचित क्षेत्र (चौ.मी.) | जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मौजे पर्वती | स.नं.९२ पै., फा.प्लॉट क्र.५१० पै., व स.नं.९३ पै., फा.प्लॉट क्र.५११पै., ५११अ पै., व ५११ब पै. | १०,३७४.११ चौ. मी. | - | १०,३७४.११ चौ. मी. | महाराष्ट्र शासन महसुल विभाग<br>सरपंच, पर्वती, देवस्थान, पुणे<br>महाराष्ट्र हौसिंग बोर्ड | पुर्वेस - रस्ता<br>पश्चिमेस - फा.प्लॉट नं.५१०पै. व ५११ब पै.<br>दक्षिणेस - रस्ता<br>उत्तरेस - फा.प्लॉट नं.५११पै., ५११अ पै. व ५११ब पै. | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- २९/०९/२०२२

29.9.2022

राजेंद्र निंबाळकर (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

Clear o/c

प्रत :- रजि. पोस्ट द्वारे

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (राज्य शासन, महसुल विभाग)
२. सरपंच, पर्वती देवस्थान, पुणे मार्फत श्री. देवदेवेश्वर संस्थान, पर्वती व कोथरुड, पुणे
३. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड (म्हाडा), पुणे-०१
४. मा. सह धर्मादाय आयुक्त, पुणे
आपले लक्ष उक्त अधिनियमाच्या सुधारित कलम ३ क कडे वेधण्यात येत आहे. उक्त आदेश अंतिम करण्यात आल्यानंतर या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी आपल्या अथवा आपल्या विभागाच्या वेगळ्या संमती अथवा ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही. खाजगी क्षेत्राचे बाबतीत विकसकाकडे मालकी / विकसन हक्क नसल्यास ते क्षेत्र उक्त अधिनियमामधील प्रकरण पाच मधील तरतूदींन्वये संपादित करण्यात येईल तसेच अशा शासकिय / निमशासकिय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या तसेच संपादित खाजगी क्षेत्राचा मोबदला उक्त अधिनियमाच्या कलम १७ मधील तरतूदीनुसार निर्धारित करण्यात येईल इतका अनुज्ञेय असेल.
५. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.१, झोपुप्रा पुणे यांना सुचित करण्यात येते कि या अधिसूचनेच्या प्रती योजनाक्षेत्र / झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा
६. सहाय्यक संचालक नगर रचना, झोपुप्रा पुणे यांना सुचित करण्यात येते कि उक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रात समाविष्ट ज्या खाजगी क्षेत्राचे विकसकास हक्क प्राप्त नाहीत त्या क्षेत्राचे भूसंपादनाची तसेच या खाजगी व शासकिय / निमशासकिय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या तसेच संपादित खाजगी क्षेत्राचा मोबदला उक्त अधिनियमाच्या कलम १७ मधील तरतूदीनुसार निर्धारित करण्यासाठीची कार्यवाही करावी.

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी

१. मा. आयुक्त, पुणे/ पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना गवनि / झोनिपू विभागाचे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
२. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात हि विनंती.